# प्रबोधन
## गोरेगाव

### २८ वा वार्षिक अहवाल
### १९९९-२०००



# साखळी ....

'प्रबोधन' या महान शब्दाचा कोषातील अर्थ असू द्या - जागे करणे, शिकविणे वगैरे. या संस्थेसाठी तरी ती एक प्रत्यक्षात अवतरलेली संकल्पना आहे. आम्ही तो एक जीवनमार्ग मानतो. या मार्गावर गेल्या अठ्ठावीस वर्षात माणसांचे अनेक समूह जवळ आले. कलाकार, खेळाडू, विद्यार्थी, शिक्षक, रसिक श्रोते आणि प्रेक्षक यांचे समूह. अगणित लोकांना आनंद, समाधान, यश मिळवून देण्याचा प्रयत्न म्हणजे प्रबोधन.

आम्ही माणसे घडवितो, असा आव आणण्यात काही अर्थ नसला तरी अठ्ठावीस वर्षांच्या प्रदीर्घ काळात संस्थेकडे येणाऱ्या प्रत्येकासाठी काही ना काही सातत्याने घडत राहिले. क्रीडाभवन आणि जॉगर्स पार्क सारखे प्रकल्प उभे झाले. फास्ट फूड आणि पॉप म्युझिकच्या या जमान्यात टी.व्ही. समोर बैठक मारुन बसण्यापलिकडे खूप काही चांगले करता येते हे सांगण्याचा, दाखविण्याचा प्रयत्न झाला. खेळाच्या मैदानावर, पुस्तकांच्या संगतीत, रंगलेल्या मैफलीत, ज्ञान-रंजनाच्या व्यासपीठासमोर येऊन निखळ स्वच्छ करमणूक आणि सशक्त संस्कारांमध्ये रमण्याची हाक प्रबोधनने दिली. त्या हाकेला प्रतिसाद देणाऱ्यांची संख्या मामुली निश्चितच नाही. हेच आहे भूतकाळातील संचित आणि हीच आहे भविष्यातील आशा.

हे सर्व होत असताना अठ्ठावीस युगांची स्वप्ने पहाणाऱ्या कार्यकर्त्यांची एक संपूर्ण पिढी आता वयपरत्वे मंदावणे स्वाभाविक आहे. परंतु, पोकळी निर्माण होऊ न देण्याच्या जिद्दीने ताज्या दमाची तरुण पिढी कामाला लागली सुद्धा. जुन्या-नव्या कार्यकर्त्यांची ही मजबूत साखळी हेच 'प्रबोधन'चे वैभव. लोकांचे, लोकांसाठी, लोकांनी अभिमानाने मिरवावे असे वैभव !

– सुभाष देसाई

# प्रबोधन, गोरेगाव

## प्रबोधन क्रीडाभवन

प्रबोधन क्रीडाभवन मार्ग, सिद्धार्थ नगर, गोरेगाव (प.), मुंबई ४०० १०४

### २८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

प्रबोधन गोरेगाव या संस्थेची २८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार, दि. २९ जुलै २००० रोजी रात्री ९-०० वाजता प्रबोधन क्रीडाभवन, प्रबोधन क्रीडाभवन मार्ग, सिद्धार्थ नगर, गोरेगाव (प.), मुंबई ४०० १०४ येथे आयोजित करण्यात आली आहे. या सभेस सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

**सभेपुढील कामकाज :**

१ प्रास्ताविक.

२ मागील वार्षिक सभेचे इतिवृत्त वाचन व त्यास मंजूरी देणे.

३ १९९९-२००० चा वार्षिक अहवाल, आयव्यय पत्रक व ताळेबंद हिशेब तपासनीसांच्या अहवालासह वाचून मंजूर करणे.

४ गतवर्षी सादर केलेल्या घटना दुरुस्तीस मान्यता देणे.

५ नवीन वर्षा करिता २०००-२००१ घटनेच्या कलम ७ इ. प्रमाणे अध्यक्ष (१ जागा) उपाध्यक्ष (२ जागा) व कार्यकारी मंडळावरील निवृत्त झालेल्या ३ सभासदांच्या जागी नवीन सभासदांची निवड करणे (एकूण ६ जागा).

६ नवीन वर्षाकरिता अंतर्गत हिशेब तपासनीस व सरकारमान्य हिशेब तपासनीस यांची नेमणूक करणे.

७ अध्यक्षांच्या अनुमतीने सभेपुढे येणारी कामे.

कार्यकारी मंडळाच्या आज्ञेवरुन,

**पांडुरंग पोखरकर**

कार्याध्यक्ष

**डॉ. मनोहर अद्वानकर**

प्रमुख कार्यवाह

दि. १० जुलै २०००

गोरेगाव, मुंबई

---

१ संस्थेचा जमाखर्च, प्रबोधन क्रीडाभवन, प्रबोधन क्रीडाभवन मार्ग, सिद्धार्थ नगर, गोरेगाव (पश्चिम), मुंबई ४०० १०४ येथील संस्थेच्या कार्यालयात दि. २१-७-२००० ते २२-७-२००० रोजी संध्याकाळी ६ ते ७ या वेळेत अवलोकनार्थ ठेवण्यात येईल. कोणाही सभासदास त्याबाबतीत काही सूचना करावयाच्या असल्यास त्या दिनांक २५ जुलै २००० पूर्वी कार्याध्यक्षांकडे लेखी सादर कराव्यात.

२ गणसंख्येच्या अभावी वरील सभा तहकूब झाल्यास, तहकूब झालेली सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल व अशा सभेस गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.

३ निवडणुकीस उभे राहू इच्छिणाऱ्या सभासदांनी आपले अर्ज दि. २५ जुलै २००० पूर्वी संस्था कार्यालयात संध्याकाळी ६ ते ७ या वेळात आणून द्यावेत. अर्जाचा नमुना सोबत दिला आहे. (परिशिष्ट ड).

# प्रबोधन, गोरेगाव

## २८ वा वार्षिक अहवाल

(कालावधी : १ एप्रिल १९९९ ते ३१ मार्च २०००)

सन्माननीय सभासद बंधु-भगिनीनो,

गेली २८ वर्षे ज्ञान, कला, सेवा व क्रीडाक्षेत्रात सातत्याने कार्यरत असणाऱ्या प्रबोधन, गोरेगाव या आपल्या संस्थेच्या मागील वर्षात केलेल्या कार्याचे इतिवृत्त त्याचप्रमाणे १ एप्रिल १९९९ ते ३१ मार्च २००० या वर्षाचा ताळेबंद व जमाखर्च पत्रक आपल्या माहितीसाठी त्याचप्रमाणे आपल्या कृपाशिर्वादासाठी सादर करतांना कार्यकारी मंडळास आनंद होत आहे.

समाजसेवेचे ब्रीद सांभाळत असतानाच क्रीडा याप्रकाराकडेही संस्थेचे लक्ष होतेच. वांद्रे ते दहिसर या पश्चिम उपनगरातील उदयोन्मुख खेळाडूंना त्यांच्या अंगचे सुप्त क्रीडागुण प्रकट करण्याची संधी उपलब्ध नाही हे जाणून १९७८ पासून संस्थेने सिद्धार्थनगरच्या क्रीडांगणावर क्रीडामहोत्सवाच्या आयोजनास सुरुवात केली. पहिल्या वर्षी फक्त २२ शाळांचा, त्यासुद्धा बहुतांशी गोरेगाव-मालाड या परिसरातील, सहभाग लाभलेल्या या क्रीडामहोत्सवास प्रतिवर्षी वाढता प्रतिसाद लाभला व १०० हून अधिक शाळांचे विद्यार्थी/विद्यार्थीनी या क्रीडामहोत्सवात सहभागी होऊ लागले. क्रीडाप्रकाराकडे बघण्याचा समाजाचा दृष्टीकोन निराशाजनकच आहे. क्रीडाप्रकारात फक्त क्रिकेट सोडून, नैपुण्य मिळविण्यासाठी इतरही सोयीसवलती व तज्ज्ञांचे मार्गदर्शन क्रीडापटूंना उपलब्ध व्हावे या हेतूने व स्वतःची वास्तू असावी हा दृष्टीकोन बाळगून संस्थेने प्रबोधन क्रीडाभवनासारख्या वास्तूची निर्मिती केली. सिद्धार्थनगर क्रीडांगणासारखे सुसज्ज क्रीडांगण खेळाडू त्याचप्रमाणे गोरेगावच्या नागरिकांना उपलब्ध करुन दिले. ऑलिम्पिक मध्ये हिंदुस्थानची पदकांची पाटी नेहमीच कोरी असते. त्या ऑलिम्पिक मध्ये एकतरी खेळाडू चमकावा व त्याने हिंदुस्थानसाठी पदक मिळवावे, या जाणीवेतून संस्थेचे संस्थापक व शिवसेना नेते श्री. सुभाष देसाई यांच्या कल्पक मार्गदर्शनाखाली प्रोजेक्ट २००० सारखा उपक्रम संस्थेने स्वखर्चाने राबविला व काही अंशी यशस्वी करुन दाखविला. एखाद्या खाजगी संस्थेतर्फे असा उपक्रम स्वखर्चाने राबविला जाण्याचे हे एकमेव उदाहरण असावे. या उपक्रमातून प्रशिक्षण घेतलेल्या खेळाडूंनी अनेक स्पर्धात आपली चमक दाखविली आहे. क्रिकेट प्रमाणेच खो-खो, कबड्डी, मल्लखांब व कराटे यासारख्या क्रीडाप्रकारांसाठी संस्थेने प्रबोधन क्रीडाभवनाची द्वारे त्या खेळाडूंसाठी अत्यंत अल्पदरात उघडी ठेवली व त्याचा चांगला परिणाम दिसून आला. खो-खो, कबड्डी व मल्लखांब या विविध संस्थांचे पदाधिकारी आज प्रबोधन क्रीडाभवनाला आपलीच वास्तू मानतात. अनेक राज्यस्तरीय स्पर्धांचे आयोजन या मैदानावर होते, याचा संस्थेस रास्त अभिमान आहे व संस्थेने सढळ हस्ते राबविलेल्या क्रीडाविषयक धोरणाचा तो एक परिपाक आहे. संस्थेपुढे समाजसेवेची अनेक दालने खुली आहेत व समाजसेवेशी बांधिलकी मानणाऱ्या संस्थेस आता अनेक क्षेत्रे पादाक्रांत करावयाची आहेत याची जाणीव आम्ही ठेवली आहे. त्यासाठी निष्ठावान व सेवाभावी कार्यकर्त्यांचे पाठबळ संस्थेस आहेच त्याचप्रमाणे स्थानिक नागरिकांचे मोलाचे सहकार्य संस्थेस लाभले आहे. त्याचबरोबर सढळ हस्ते मदत करणाऱ्या अनेक उद्योगपतींचे व उद्योगसमूहांचे पाठबळ संस्थेस कार्यपूर्तीसाठी व स्वप्नपूर्तीसाठी हवे आहे.

### सभासद

अहवाल वर्षा अखेरीस प्रबोधन गोरेगावचे ८ आश्रयदाते, ४११ आजीव सभासद तसेच प्रबोधन क्रीडा भवनाचे ४८४ दीर्घ मुदतीचे सभासद आहेत.

### वार्षिक सर्वसाधारण सभा :

संस्थेची २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. २९ जानेवारी २००० रोजी प्रबोधन क्रीडाभवनावर पार पडली. संस्थेच्या स्थापनेच्यावेळी संस्थेपुढे फारच मर्यादित उद्दिष्टे होती. त्या दृष्टीने संस्थेची घटना व नियम करण्यात आले होते, पण संस्थेच्या वाढत्या व व्यापक उद्दिष्टांमुळे त्यात काही फेरबदल करणे व नविन नियम व कलमे घटनेत समाविष्ट करणे आवश्यक होते. त्यादृष्टीने संस्थेची घटना दुरुस्ती करण्याचे ठरले व तशा आशयाचा तपशील सर्व सभासदांस पाठविण्यात आला. त्या तपशीलावर वार्षिक सर्वसाधारण सभेत साधकबाधक चर्चा होऊन घटना दुरुस्ती काही दुरूस्त्यांसह सर्वसंमतीनेच मंजूर करण्यात आली. अध्यक्ष, उपाध्यक्ष व कार्यकारी मंडळावरील निवृत्त झालेल्या सभासदांच्या जागी कोणतेही नविन अर्ज न आल्याने त्याच व्यक्तिंची त्यांच्या संमतीने त्या त्या पदावर फेरनिवड करण्यात आली. संस्थेचे खजिनदार श्री. महादेव खानोलकर यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या खजिनदार पदावर संस्थेचे सहकार्यवाह श्री. नितीन शिंदे यांची नेमणूक करण्यात आली. त्यामुळे रिक्त झालेल्या सहकार्यवाह पदावर संस्थेचे कार्यकारिणी सदस्य श्री. मिलिंद डुंबरे यांची नेमणूक करण्यात आली. संस्थेच्या एकंदर कार्याचा व आर्थिक परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. संस्थेची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी अनेक बाबींचा उहापोह या वार्षिक सर्वसाधारण सभेत करण्यात आला. त्याचप्रमाणे क्रीडाभवनात संस्थेतर्फे राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची जबाबदारी काही कार्यकारिणी सदस्यांना वाटून देण्यात आली व प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी होणाऱ्या कार्यकारिणीच्या सभेत प्रत्येक सभासदाने आपापल्या उपक्रमांच्या/कार्यक्षेत्राची माहिती सादर करावी असे सर्वानुमते ठरविण्यात आले.

### प्रबोधन क्रीडाभवन : संस्थेची क्रीडाक्षेत्रातील अतुलनीय कामगिरी :

प्रबोधनने १९७७ साली पहिला आंतरशालेय क्रीडामहोत्सव आयोजित करून क्रीडाविश्वात पदार्पण केले. या पदार्पणानंतर संस्थेस जाणवले की, या क्षेत्रात भरीव कामगिरी करता येण्यासारखी आहे आणि संस्थेने क्रीडाभवन उभारण्याचे स्वप्न पाहिले व शिवसेना नेते व संस्थेचे संस्थापक श्री. सुभाष देसाई यांच्या संकल्पनेतून व अनेक मान्यवरांच्या अथक परिश्रमातून प्रबोधन क्रीडाभवनासारखी देखणी वास्तू उभी राहिली. या क्रीडाभवनात बालकांना आणि युवकांना सुदृढ व निपुण बनविण्यासाठी तज्ज्ञ प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली प्रयत्न केले जातात. क्रीडाभवनात आधुनिक उपकरणांनी सुसज्ज अशी व्यायामशाळा आहे. जाकुझी, सोनाबाथ व स्टीम बाथची सोयही आहे. त्याचप्रमाणे, पहिल्या मजल्यावरील योगकेंद्रात मुरब्बी प्रशिक्षकांद्वारे प्रशिक्षण देण्याची सोय आहे. कराटे, जिमनॅस्टिक्स, ॲरोबिक्स, क्रिकेट, खो-खो, कबड्डी, मल्लखांब यांचेही प्रशिक्षण मुलांना अत्यंत माफक दरात प्रबोधनने उपलब्ध करून दिले आहे. प्रबोधन क्रीडाभवन ही वास्तू आज अनेक खेळाडूंना व संस्थांना आपली स्वतःचीच वाटते, हेच प्रबोधनच्या आजवरच्या यशाचे गमक आहे.

प्रवेशद्वारापाशी उभारण्यात आलेले छत्रपती शिवाजी महाराजांचे शिल्प या मैदानास इतर मैदानांपासून सर्वस्वी वेगळे रुप बहाल करते. या जॉगर्स पार्कच्या उभारणीसाठी अनेक व्यक्ति व संस्थांचे सहकार्य तर लाभलेच परंतु या जॉगर्स पार्कच्या उभारणीसाठी गोरेगावच्या माननीय आमदारांनी त्यांच्या आमदार निधीतून उपलब्ध करुन दिलेली आर्थिक मदत फारच मोलाची आहे. 'प्रबोधन', गोरेगावचे स्थापनेपासून आजीव सभासद व हितचिंतक असणारे गोरेगावचे आमदार सर्वश्री गजानन कीर्तिकर, नंदकुमार काळे, आमदार श्री. प्रमोद नवलकर, आमदार श्री. शांताराम नांदगावकर, आमदार सौ. नीलाताई देसाई यांनी त्यांच्या आमदार निधीतून भरघोस आर्थिक मदत केली याचा संस्थेस अभिमान वाटतो व त्याबद्दल संस्था त्यांची ऋणी आहे.

अशा या सर्वांगसुंदर जॉगर्स पार्कचे उद्‌घाटन शिवसेना नेते श्री. उद्धवजी ठाकरे यांच्या शुभहस्ते दिमाखदार सोहळ्यात दि. २१ मे १९९९ रोजी करण्यात आले. **याप्रसंगी बोलतांना शिवसेना नेते श्री. उद्धव ठाकरे यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. फक्त क्रिकेट या खेळावरच लक्ष केंद्रित न करता, टेनिससारख्या खेळातही चांगले खेळाडू निर्माण व्हावेत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. प्रबोधन, गोरेगावने स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मदतीने केलेल्या कामाचे कौतुक करतांना प्रबोधनच्या सर्व कार्यकारिणी सदस्यांचे नावानिशी त्यांनी कौतुक केले. गोरेगावातील आधीच्या लोकप्रतिनिधींनी, गोरेगावात अनेक मैदाने उपलब्ध असतांना त्यांच्या विकासाकडे कधीच लक्ष दिले नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. त्यामुळेच प्रबोधनचे कार्य अधिक लोकाभिमुख व उठावदार झाले आहे. अशी शाबासकीही त्यांनी दिली. या उपक्रमासाठी आपल्या आमदार निधीतून निधी उपलब्ध करुन दिल्याबद्दल त्यांनी आमदार श्री. शांताराम नांदगावकर, श्री. प्रमोद नवलकर, श्री. नंदकुमार काळे, सौ. नीला देसाई यांचे खास अभिनंदन केले.** त्याप्रसंगी सर्वश्री गजानन कीर्तिकर, नंदकुमार काळे व सौ. नीला देसाई व शांताराम नांदगावकर हे आमदार, म्हाडाचे सदस्य श्री. विजय नाडकर्णी, संस्थेचे संस्थापक व शिवसेना नेते श्री. सुभाष देसाई, संस्थेचे सर्व पदाधिकारी, श्री. राम म्हात्रे, सौ. सुधा टेंबवलकर, श्री. दिलीप शिंदे हे नगरसेवक व खास पाहुणे म्हणून मुंबईचे महापौर श्री. हरेश्वर पाटील उपस्थित होते. संस्थेच्या या उपक्रमास गोरेगावच्या नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला व वाचनालयाचे शेकडो सभासद अल्पावधीतच नोंदले गेले. संस्थेने सांस्कृतिक क्षेत्रात केलेल्या कार्याची गोरेगावकरांनी आपल्या पसंतीची पावती अशा तऱ्हेने दिली. संस्थेने सुरु केलेल्या या वाचनालयास नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद तर दिलाच, पण अनेकांनी आपली पुस्तके या वाचनालयास देणगी रुपाने दिली. त्याचप्रमाणे श्री. पांडुरंग पोखरकर, गोरेगाव महिला समिती, श्री महालक्ष्मी ट्रस्ट, विलेपार्ले यांनी देणगीरुपाने वाचनालयास मदत केली. या जॉगर्स पार्क व वाचनालयाच्या उभारणीत स्थानिक नगरसेवक श्री. सुनिल प्रभू, सौ. सुधा टेंबवलकर, श्री. राम म्हात्रे, श्री. दिलीप शिंदे, सौ. साधना माने व शाखाप्रमुखांचे भरघोस सहकार्य लाभले हे याठिकाणी आवर्जून नमूद करावेसे वाटते.

## गोरेगावकरांना अभिमान वाटावा असे गोरेगावातील सुसज्ज 'प्रबोधनकार ठाकरे वाचनालय'

१ जून १९९९ रोजी सुरु झालेल्या प्रबोधनकार ठाकरे वाचनालयाचे केवळ १० महिन्यांच्या अल्पशा कालावधीत ३७१ सभासद झाले. तर फक्त दिवाळी अंक वाचण्यासाठी ११२ नवीन सभासद नोंदले गेले. १७५ दिवाळी अंक ३ महिन्यात वाचण्याची फी केवळ रु. १००/- एवढी होती. तर वाचनालयाच्या सभासदांना रु. ७५/- हे सवलत मूल्य ठेवले होते.

३१ मार्च २००० पर्यंत वाचनालयात मराठी, इंग्रजी व हिंदी वाङ्मयाचे ५५२९ नवीन व उत्तमोत्तम ग्रंथ उपलब्ध होते. वाचनालयाचे महिन्याचे शुल्क रु. ३०/- तर बालवाचकांसाठी ३ महिन्यांसाठी रु. ३०/- एवढे आहे. मासिके, पक्षिके व साप्ताहिकांसाठी रु. २५/- एवढे शुल्क आकारले जाते तर यापेक्षा अधिक कालावधीसाठी एकदम वर्गणी भरल्यास वर्गणीत घसघशीत सवलत दिली जाते.

उत्तरोत्तर वाचनालयाची लोकप्रियता वाढतेच आहे आणि महिन्यागणिक सभासद व ग्रंथांची संख्या वेगाने वाढते आहे. गोरेगावातील तसेच गोरेगाव बाहेरील दानशूर वाचकांनी आपल्याकडील अमूल्य अशी ३२०८ पुस्तके वाचनालयास मोठ्या उदारपणे सप्रेम भेट म्हणून दिली. आम्ही या दानशूर व्यक्तिंचे मनःपूर्वक आभार मानित आहोत. वाचनालयाची वेळ सकाळी ८ ते ११ व संध्याकाळी ४ ते ८ अशी सर्वांना सोईस्कर अशी आहे. वाचनालय रविवारी बंद असते. तत्पर व सेवाभावी असा कर्मचारी वर्ग वाचनालयास लाभला आहे. श्री. वसंत तावडे हे वाचनालयाचे संचालक म्हणून काम पहातात.

### मल्लखांब, जिमनॅस्टिक व कराटे मधील प्रबोधन क्रीडाभवनाच्या खेळाडूंचे नेत्रदिपक यश :

संस्थेने क्रीडाभवनाच्या स्थापनेपासूनच कबड्डी, खो-खो व मल्लखांब यासारख्या भारतीय क्रीडा प्रकारांच्या वृद्धीसाठी व प्रसारासाठी सातत्याने प्रयत्न केले, त्याचप्रमाणे स्वतःचे संघ बनवून त्या संघांना अनेक स्पर्धांसाठी पाठविले आणि या स्पर्धांत प्रबोधन क्रीडाभवनाच्या खेळाडूंनी चांगली चमक दाखविली. (स्पर्धांचे निकाल परिशिष्ट अ, ब, क मध्ये दिले आहेत.)

### २२ वा प्रबोधन आंतरशालेय क्रीडा महोत्सव :

वांद्रे ते दहिसर या पश्चिम उपनगरातील शालेय विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी संस्थेने आंतरशालेय क्रीडामहोत्सवाच्या आयोजनाने त्यांच्या अंगचे सुप्त क्रीडागुण प्रकट करण्यासाठी एक सुवर्णसंधीच उपलब्ध करुन दिली आहे. या क्रीडामहोत्सवात जर आपण आपल्या अंगचे क्रीडागुण प्रकट करु शकलो तर आपणास राज्यस्तरीय क्रीडाक्षेत्रात प्रवेश करणे सुलभ होते याची या खेळाडूंना पूर्णपणे जाण आली असून, त्या हेतूनेच क्रीडापटू या क्रीडामहोत्सवात सहभागी होतात. हे स्पृहणीय यश संस्थेने सातत्याने शिस्तबद्ध क्रीडामहोत्सवाच्या आयोजनाने मिळविले आहे. या वर्षीचा २२ व्या प्रबोधन आंतरशालेय क्रीडामहोत्सवाचा उद्घाटन सोहळा ६ डिसेंबर १९९९ रोजी संपन्न झाला. सतत आठवडाभर चाललेल्या या क्रीडामहोत्सवाचा सांगता समारंभ रविवार दि. १२ डिसेंबर १९९९ रोजी मुंबईचे महापौर श्री. हरेश्वर पाटील यांच्या उपस्थितीत पार पडला. त्या प्रसंगी माजी कसोटी क्रिकेटपटू श्री. अजित पै, आयडियल क्लासेसचे संचालक श्री. जगदीश वालावलकर, नगरसेवक सर्वश्री राम म्हात्रे, श्री. दिलीप शिंदे व इतर अनेक मान्यवर उपस्थित होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात महापौर श्री. हरेश्वर पाटील यांनी, या क्रीडामहोत्सवास उपनगराचे भूषण असे संबोधून प्रबोधनच्या क्रीडाक्षेत्रातील कामगिरीची मुक्तकंठाने प्रशंसा केली.

यंदाच्या क्रीडामहोत्सवात पश्चिम उपनगरातील १११ शाळांनी भाग घेतला व विविध क्रीडाप्रकारात आपले क्रीडानैपुण्य प्रकट केले. या क्रीडामहोत्सवास बँक ऑफ बडोदा, कोका-कोला, स्टेट बँक ऑफ इंडिया, आयडीयल क्लासेस, एल्.आय्.सी., सारस्वत बँक व ॲक्वाझील यांचा पुरस्कार लाभला होता. त्या सर्वांची संस्था अत्यंत ऋणी आहे. यंदाच्या वर्षीचा सर्वोत्कृष्ट संघासाठी असणारा फिरता चषक दोन शाळांनी

८) मुदत ठेव रुपये ३,३७५/- यावरील व्याज एक वर्षापेक्षाही जास्त वेळेपासून येणे आहे. सभासद फी रुपये ५,०००/- निर्लेखित करण्यात यावी.

९) रु. ५,०००/- पेक्षा अधिक किंमतीच्या दुरुस्ती किंवा बांधकामासाठी निविदा मागविलेल्या नाहीत.

१०) धर्मादाय संस्थेची कोणतीही रक्कम कलम ३५ च्या विरोधात गुंतविण्यात आलेली नाही.

११) स्थावर मालमत्तेचा कोणताही विनियोग कलम ३६ च्या विरोधात केलेला आम्हास आढळला नाही.

१२) नियमबाह्य, बेकायदेशीर व अयोग्य खर्च किंवा संस्थेस येणे असलेली रक्कम व अन्य मालमत्ता जमा करण्यामध्ये अपयश वा नकार संस्थेच्या बाबतीत आढळला नाही. त्याचप्रमाणे निधीचा अपव्यय किंवा नुकसान संस्थेने केलेले नाही.

१३) अंदाजपत्रक नियम १६-अ प्रमाणे दर्शविलेल्या नमुन्यात सादर केलेले आहे.

१४) कार्यकारिणी सदस्यांची लघुत्तम व महत्तम संख्येची तरतूद पाळण्यात आली आहे.

१५) नियमानुसार नियमितपणे सभा घेण्यात आल्या आहेत.

१६) सभांची इतिवृत्ते लिहिण्यात आली आहेत.

१७) कार्यकारिणी सदस्यांपैकी कोणाचाही संस्थेच्या गुंतवणुकीशी संबंध नाही.

१८) कोणीही कार्यकारिणी सदस्य संस्थेचा धनको व ऋणको नाही.

१९) मागील वर्षीच्या कागदपत्रांमध्ये आम्ही कोणतीही नियमबाह्यता दर्शविली नव्हती.

२०) धर्मादाय उपायुक्तांचे किंवा धर्मादाय सहआयुक्तांचे लक्ष्य वेधण्यासारखी कोणतीही विशिष्ट बाब आहे असे आम्हांस वाटत नाही.

मुंबई

दि. ३०जून २०००

सही

एस.एस. नायक आणि कं.

गौतम नायक

भागीदार

**सनदी लेखापाल**

## प्रबोधन क्रीडाभवन उपक्रमांमधील सहभागी खेळाडू.
## १९९९-२००० या वर्षातील दररोजची सरासरी संख्या.

| | | |
|---|---|---|
| व्यायामशाळा | : | २८५ |
| सोना-स्टीम जाकुझी | : | ५७ |
| टेबल टेनिस | : | २४ |
| कराटे | : | ८ |
| योगाभ्यास | : | १३८ |
| ॲथलेटिक्स | : | ४० |
| जिम्नॅस्टिक | : | ७१ |
| क्रिकेट | : | ४३ |
| एरोबिक्स | : | १५ |
| नृत्य | : | ९० |
| खो-खो | : | २५ |
| एकूण | | ७९६ |

याखेरीज उन्हाळी क्रीडा शिबिरांमध्ये १०९० खेळाडू सहभागी झाले होते.